# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.01.2026** **वार:गुरुवार**

1. नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी 33 हजार 606 उमेदवारी अर्ज दाखल
3. सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचं सर्वत्र जल्लोषात स्वागत
4. कोरेगाव भीमा इथं शौर्यदिनानिमित्त अभिवादनासाठी लाखो अनुयायांची गर्दी आणि
5. नव्याण्णवव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आजपासून साताऱ्यामध्ये सुरुवात

**मंत्रीमंडळ निर्णय**

नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहापदरी महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. 374 किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी 19 हजार 142 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदराजवळ दिल्ली-मुंबई महामार्गाला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्गावर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी इथं समृद्धी महामार्गाला जोडण्याचं प्रस्तावित आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली....

**ये प्रोजेक्ट नासिक और सोलापुर के बीच की डिस्टेंस को टाइम को सिग्निफिकेंटली रिड्यूस करेगा बी फोर्टीन पर्सेंट डिस्टेंस रिड्यूस होगी और टाइम सिग्निफिकेंटली कम होगी फोर्टी फाइव पर्सेंट रिड्यूस होगी बेटवीन चेन्नई एंड सूरत हंड्रेड केएमपी के लिए डिजाइन किया गया है, हाई स्पीड है के हिसाब से रोड और रेलवे में दोनों का हाई स्पीड की डेफिनिशन का डिफरेंस होता है। रोड के हिसाब से हंड्रेड किलोमीटर की स्पीड रहेगी इसमें।**

**राज्य मंत्रीमंडळ**

राज्य सरकारनं उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण 2025 ला मान्यता दिली आहे. पाच वर्षांसाठी हे धोरण लागू राहणार असून या कालावधीत 50 लाख रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट निर्धारित करण्यात आलं आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सरकारनं एक लाख 18 हजार 275 कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी दिली आहे.

**मनपा निवडणूक**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगानं सर्व महानगरपालिकांमध्ये दाखल झालेल्या एकंदर उमेदवारी अर्जांबाबत काल माहिती दिली. त्यानुसार राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या एकंदर 893 प्रभागांमधून 2 हजार 869 जागांसाठी 33 हजार 606 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उद्या म्हणजे 2 जानेवारीला दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. येत्या 15 जानेवारीला मतदान आणि 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान धुळे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येकी दोन उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

**नववर्ष**

सरत्या वर्षाला निरोप देत, आणि नवी स्वप्न, नव्या संकल्पांसह 2026 या नवीन वर्षाचं काल सर्वत्र जल्लोषात स्वागत करण्यात आलं. मुंबई पुण्यातील प्रमुख रस्त्यांवर काल मध्यरात्री तरुणांनी एकत्र जमून नववर्ष स्वागताचा जल्लोष केला. नववर्षाच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी उत्साहाचं वातावरण असून राज्यातल्या पर्यटन स्थळांवर, समुद्र किनाऱ्यावर प्रामुख्यानं तरुण पर्यटकांनी गर्दी केली आहे. उपाहारगृहं, क्लब्ज आणि मनोरंजन स्थळंही काल रात्रभर सुरू होती. त्यामुळं सर्वच शहरांमध्ये पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. अनेकजण नवीन वर्षाची सुरुवात देवदर्शनाने करतात त्यामुळं राज्यातली विविध देवालयं आणि धार्मिक स्थळांवरही गर्दी वाढली आहे. या

सर्व ठिकाणी सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी नागरिकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**क्रीडा**

नव्या वर्षाचं स्वागत करत असताना सरत्या वर्षातील घडामोडींचा आढावा घेणंही आवश्यक आहे. 2025 हे वर्ष भारतासाठी अनेक अर्थांनी महत्त्वाचं ठरलं, क्रीडा विश्वासाठी देखील हे वर्ष वैशिष्ट्यपूर्ण ठरलं. 'सुधारणांचं वर्ष' या विशेष मालिकेत आज भारताच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीविषयी ऐकूया माझे सहकारी प्रशांत जाधव यांच्याकडून...

**2025 या वर्षात भारतीय खेळाडूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक विक्रम प्रस्थापित केले. आणि विशेष म्हणजे महिला आणि दिव्याग क्रीडापटूनी या वर्षात अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केली. भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकत इतिहास रचला, तर भारतीय दृष्टीबाधित महिलांच्या क्रिकेट संघानेही पहिला टी-20 विश्वचषक जिंकून नवा अध्याय लिहिला. आशियाई युवा क्रीडा स्पर्धेतही भारतानं आजवरची सर्वोत्तम कामगिरी केली. या यशामध्ये महिलांचा सिंहाचा वाटा होता. जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेतली भारताची नेत्रदीपक कामगिरी, हॉकीमध्ये भारताच्या पुरुष संघानं जिंकलेला आशिया चषक, शीतल देवी हिने दिव्यागांच्या तीरंदाजीमध्ये मिळवलेलं विश्वविजेतेपद, महिलांच्या फिडे बुद्धिबळ स्पर्धेतली दिव्या देशमुखची देदीप्यमान कामगरी... भारतीय क्रीडापटूंच्या कामगिरीची ही यादी आणखीही खूप मोठी होईल. खेळाडूंच्या या कामगिरीला गुणवंत प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाबरोबरच साथ होती ती देशातील क्रीडा व्यवस्थेतल्या पायाभूत सुधारणांची.. जुलै 2025 मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय क्रीडा धोरणाला मंजुरी दिली. भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवण्याच्या दृष्टीनं दीर्घकालीन आराखडा यात मांडण्यात आला आहे. केंद्र सरकारनं क्रीडा क्षेत्रासाठी केलेली विक्रमी गुंतवणूक, महत्त्वपूर्ण धोरणात्मक सुधारणा यामुळे 2025 या वर्षात भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी एका नव्या युगाची मजबूत पायाभरणी झाली आहे.**

**शौर्यदिन**

पुण्याजवळ कोरेगाव भीमा इथं आज शौर्यदिन उत्साहामध्ये साजरा केला जात आहे. या ठिकाणी असलेल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायींनी मोठी गर्दी केली आहे. ऐकूया अधिक माहिती .........

**विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी काल रात्रीपासून मोठ्या प्रमाणावर अनुयायी कोरेगाव भीमा इथं दाखल झाले आहेत. या ठिकाणी अंत्यंत उत्साहाचं वातावरण आहे. ऐतिहासिक विजयस्तंभाला केलेली फुलांची आकर्षक सजावट सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. विजय दिनाच्या पार्श्वभूमीवर याठिकाणी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला असून 5 हजार पोलीस सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आले आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी 50 पोलिस टॉवर, 10 ड्रोनची याठिकाणी नजर असणार आहे. जिल्हा प्रशासनाने अनुयायांसाठी सर्व प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. बार्टीच्यावतीने 310 बुक स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. पीएम पी एम एल नं अनुयायांसाठी मोफत बस सुविधा उपलब्ध करून दिली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरू, पुणे.**

**साहित्य संमेलन-सातारा**

नव्व्याण्णवं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आजपासून साताऱ्यात सुरू होत आहे. या संमेलनाचं औपचारिक उद्घाटन उद्या ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील उद्घाटन समारंभाला उपस्थित राहणार आहेत. चार दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनाबाबत अधिक माहिती देताना कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी म्हणाले.....

**नव्व्याण्णव व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आजपासून साताऱ्यात होत आहे. एक जानेवारीला सकाळी ध्वजारोहण ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्रकाशन कट्टा कवी कट्टा गझल कट्टा यांचे उद्घाटन होणार आहे. ग्रंथ दिंडी होणार आहे. साताऱ्यातील ज्येष्ठ साहित्यिकांचा सन्मान आणि भोरूपी वडाचा कार्यक्रम होणार आहे. दोन जानेवारी रोजी संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. डॉक्टर मृदू लेखिका उद्घाटक आहेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. दुपारी कवी संमेलन संवाद बालकुमार वाचकांशी ज्ञानपीठ विजेते लेखक करणार आहेत. तीन जानेवारीला लेखक प्रकाशकांचा सत्कार आणि चार जानेवारीला पुस्तक चर्चा असणार आहे. समारोपाचा कार्यक्रम होणार आहे, आणि भारतीय संस्कृतीचं दर्शन घडवणाऱ्या पोक व्याख्यानाचाही कार्यक्रम होणार आहे.**

**शिवराजसिंह चौहान-अहिल्यानगर**

बनावट बियाणे आणि कीटकनाशक कंपन्यांवर अंकुश ठेवण्यासाठी केंद्र सरकार नवीन कायदे आणणार असल्याचं केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. शिवराजसिंह चौहान कालपासून राज्याच्या दौऱ्यावर आहेत; काल त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात बाभळेश्वर इथं शेतकरी मेळाव्यात मार्गदशन केलं. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत केंद्राने 367 कोटी रुपयांचा निधी वितरित केल्याची माहितीही चौहान यांनी दिली. शिवराज सिंह चौहान यांनी काल रात्री शिर्डीच्या साईबाबा मंदिरात दर्शन घेतलं. उद्या नाशिकमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात होणाऱ्या एका कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

**सदानंद दाते**

राज्याच्या पोलीस महासंचालकपदी सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय पोलिस सेवेच्या 1990 च्या तुकडीचे ते अधिकारी आहेत. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ 3 जानेवारीला संपणार आहे. त्यांच्या जागी दाते यांची दोन वर्षांसाठी नियुक्ती झाली आहे. यापूर्वी ते राष्ट्रीय तपास संस्थेच्या प्रमुख पदावर कार्यरत होते.

**निवृत्त आकाशवाणी**

आकाशवाणी नाशिक इथले अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक संचालक मिलिंद पारनाईक काल 37 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या विविध कार्यालयांमध्ये त्यांनी काम केलं.

**हवामान**

राज्याच्या काही भागात थंडीचा जोर काहीसा कमी झाला आहे. मुंबईत आज सकाळी हलका पाऊस पडला. काल अहिल्यानगरमध्ये राज्यातल्या सर्वात कमी, म्हणजे 8 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.